# गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली.

(महाराष्ट्र शासन अधिसुचना क्रमांक २००७/(३२२/०७) विशि-४ महाराष्ट्र विद्यापीठ अधिनियम १९९४ (१९९४ चा महा.३५)च्या कलम ३ च्या पोटकलम (२) अन्वये दिनांक २७ सप्टेंबर २०११ रोजी स्थापीत व महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ (सन २०१७ चा महाराष्ट्र विद्यापीठ अधिनियम क्रमांक ६) व्दारा संचालत त राज्य विद्यापीठ)

**(क्रीडा व शारीरिक शिक्षण विभाग)**

एम.आय.डि.सी. रोड कॉम्प्लेक्स, गडचिरोली – ४४२६०५

जावक क्र./गों.वि.ग./क्री.शा.शि./ ५७ /२०२३ दिनांक : २५/०१/२०२३

## सुचना

**विषय - अमृत क्रीडा व कला महोत्सव -२०२३, क्रीकेट स्पर्धा- गों. वि. गडचिरोली विरुद्ध मो. जव्हेरी महा. वडसा**

संदर्भ - या कार्यालयाचे पत्र क्र. २१/२०२३, दिनांक ०९/०१/२०२३

गोंडवाना विद्यापीठातील शिक्षकेत्तर तसेच संलग्नित महाविद्यालयांतील शिक्षकेत्तर कर्मचारी यांना याव्दारे सुचित करण्यात येते की, **अमृत क्रीडा व कला महोत्सवा**चे गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली येथे दि. २७ ते २९ जानेवारी, २०२३ दरम्यान आयोजन करण्यात आलेले आहे. संदर्भीय पत्रान्वये सर्व खेळांचे सुयोग्य नियोजनाच्या अनुषंगाने क्रीकेटचे साखळी सामने दोन झोन **(झोन - वरोरा व नवरगाव)** मध्ये खेळविण्यात आलेले होते.

**वरोरा झोन** मधुन प्रथम क्रमांक **(A)** जनता महाविद्यालय, चंद्रपूर व व्दितीय क्रमांक **(B)** चिंतामणी महाविद्यालय, पोंभुर्णा यांनी पटकविला आहे.

**नवरगाव झोन** मधुन अंतिम फेरीत गेलेले गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली व मोहसिनभाई जव्हेरी महाविद्यालय वडसा यांचा तांत्रिक कारणामुळे अंतिम सामना होवू शकला नाही. तरी सदर सामना हा खालील दिनांक, वेळी व स्थळी खेळविण्यात येणार आहे. याची सर्व संबंधीतांनी नोंद घ्यावी.

**स्पर्धेची दिनांक : दि. २७ जानेवारी, २०२३**
**रिपोर्टींगची वेळ : सकाळी ०८.०० वाजता**
**स्पर्धेचे स्थळ : जिल्हा क्रीडा स्टेडिअम, गडचिरोली जि. गडचिरोली**
**स्पर्धा प्रमुख : डॉ. राजेंद्र गोरे, भ्रमणध्वनी क्र. ९४२१७०४९८८**

त्यापुढील सामने खालीलप्रमाणे खेळविले जातील, याची सर्व संबंधीतांनी नोंद घ्यावी.




**अटी :-**

१. प्रत्येक सामना १० षटकांचा राहील.
२. क्रिकेट सामना हेवी टेनिस बॉल ने खेळविल्या जाईल.
३. प्रत्येक संघातील नियमीत शिक्षकेत्तर कर्मचारी यांनी स्वखर्चाने नियोजीत ठिकाणी खेळण्याकरीता वेळेत उपस्थित राहावे, अनुपस्थित राहील्यास संघ बाद ठरविण्यात येईल.
४. प्रत्येक क्रिकेट संघाने बॅट व इतर आवश्यक साहीत्य स्वत: घेऊन यावे.
५. प्रत्येक संघातील कर्मचारी यांनी खेळाच्या ठिकाणी महाविद्यालयाचे/विद्यापीठाचे मुळ ओळखपत्र व आधार कार्ड सोबत घेऊन यावे, नियमानुसार नियमीत शिक्षकेत्तर कर्मचारी यांनाच संघात स्थान राहील, नियमांचे उल्लंखन केल्यास संघास बाद ठरविण्यात येईल.
६. विद्यापीठाकडे नोंदणी केलेल्याच कर्मचाऱ्यांची ओळख पटवून त्यांना संघात स्थान द्यावे.
७. पंचाचा निर्णय अंतिम राहील.
८. प्रत्येक कर्मचारी यांनी खेळतांना खेळ भावनेतुन खेळावे.
९. नशा/धुम्रपान करण्यास सक्त मनाई असेल, तसेच प्रशासकीय कार्यवाहीस प्राप्त असेल.
१०. खेळतांना इजा होणार नाही याची दक्षता घ्यावी, इजा झाल्यास स्वत: जबाबदार राहील.
११. विद्यापीठामार्फत नियुक्त परिक्षकांच्या देखरेखी खाली सामने खेळविले जातील व त्याचा अहवाल वेळोवेळी क्रिडा व शारिरीक शिक्षण विभाग, गों.वि. गडचिरोली यांचे कडे सादर करणे बंधनकारक राहिल.

डॉ. अनिता लोखंडे
संचालक, क्रीडा व शा. शिक्षण विभाग
गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली

प्रतिलिपी माहितीस्तव -

1) मा. कुलगुरू, गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली
2) मा. प्र-कुलगुरू, गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली
3) मा. कुलसचिव, गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली